ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 4 | DECEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्वातंत्र्युपर्व काळातील भाकपच्या वारंवार बदलेल्या भूमिका आणि धोरणांची प्रफुल्ल बिडवई यांनी केलेली मीमांसा

अहमद महंमद शेख
सहायक निर्माता, एबीपी माझा

**सारांश-**



स्वातंत्र्युपर्व काळातील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वारंवार बदलेल्या भूमिका आणि धोरणांची प्रफुल्ल बिडवई यांनी केलेली मीमांसा, या विषयावरील संशोधनपत्र लिहीत असताना प्रामुख्याने डाव्या विचारांचे पुरस्कर्ते असलेल्या जेष्ठ लेखक आणि डावे विचारवंत प्रफुल्ल बिडवई यांनीच त्यांच्या पुस्तकात भाकपच्या पतनाचे कारण म्हणजे वेळोवेळी भाकपने बदलेल्या भुमिका आणि धोरणे याची विस्तृत केलेल्या चर्चेचे संदर्भ देण्यात आले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने सोव्हिएतच्या कॉमिन्टर्न आणि कम्यनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएत युनियन धोरणांनुसार भारतातली पक्षाची धोरणे ठरविण्यात आली. उसन्या विचारांवर भारतीय कम्युनिस्ट पार्टी सतत चालत राहिली सोव्हिएतने भूमिका बदलली की भारततीही भूमिका बददली जायची, भारताच्या परिप्रेक्ष्यात या भूमिका बदलताना कधीच भाकपने विचार केला नाही. त्यामुळे भाकपचे पतन हे नेहमीच होत राहिले. प्रफुल्ल बिडवई यांनी त्यांच्या 'द फिनिक्स मोमेंट : द चॅलेंजेस फेसिंग इंडियन लेफ्ट या २०१५ साली लिहीलेल्या इंग्रजी पुस्तकात डाव्या चळवळींचा मागोवा घेतलेला आहे. हा मागोवा घेत असताना या संशोधनपत्रात, बिडवई यांनी डाव्या चळवळीतल्या भाकपच्या स्वातंत्र्यपुर्व काळात नेहमी बदलणाऱ्या भूमिकांचे विश्लेषणात्मक संशोधन केले आहे. या संशोधनपत्रात बिडवईंच्या मतांचा उल्लेख करत, निष्कर्षाप्रत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.

**कीवर्डस-** भाकप, प्रफुल्ल बिडवई, स्वातंत्र्यपुर्व काळ, भाकपाच्या वारंवर बदलेल्या भुमिका, मिमांसा, भाकपची बदलेली धोरणे

## प्रस्तावना –

प्रफुल्ल बिडवई हे सामाजिक कार्यकर्ते होते, शिवाय पत्रकार आणि लेखकही होते. त्यांनी फायनान्शिअल एक्स्प्रेस , टाईम्स ऑफ इंडिया आदी मासिक आणि दैनिकांतून लेखन केले. त्यांनी त्यांच्या 'द फिनिक्स मोमेंट : द चॅलेंजेस फेसिंग इंडियन लेफ्ट या २०१५ साली लिहीलेल्या इंग्रजी पुस्तकात डाव्या चळवळीच्या घसरणीची मीमांसा केलेली आहे. डावी चळवळ जगभर पसरलेली असताना. या चळवळीला कोणत्या कारणांमुळे उतरती कळा लागली याचा उहापोह त्यांनी त्यांच्या पुस्तकाच्या माध्यमातून केला. सदरील पुस्तकाचा मराठी अनुवाद मिलिंद चंपानेरकर यांनी केला असून अनुवादीत पुस्तकाचं नावं 'भारतातील डाव्या चळवळीचा मागोवा – इतिहास, आव्हानं आणि नवसंजीवनीच्या शक्यता' असं आहे. हे पुस्तक रोहन प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. स्वत: डावे असताना देखील प्रफुल्ल बिडवई यांनी डाव्या चळवळींचा होणारा ऱ्हास अगदी सविस्तरपणे मांडला आहे. या पुस्तकात त्यांनी डाव्या चळवळी किती छान काम करत आहेत किंवा डाव्या चळवळींचा इतिहास किती स्वर्णिम होता हे देखील मांडले आहे मात्र डाव्या चळवळींमध्ये सर्वच स्तरावर संधीसाधू लोक

घुसले आणि पर्यायाने डावी चळवळ ही केवळ संधीसाधू राहिली, डाव्या चळवळींची संरचना केवळ सांगाड्याच्या स्वरूपात अस्तित्वात राहिल्याची देखील त्यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केले आहे.नवउदारमतवादी धोरणाशी जुळवून न घेता त्यावर टीका टिपण्णी करण्यातच डाव्यांनी वेळ घालवला आणि उरली सुरलीसुध्दा सत्ता डाव्यांनी२०११ साली हातातून घालवल्याची खंतही प्रफुल्ल बिडवई यांनी त्यांच्या मनोगतामध्येच व्यक्त केली आहे. प्रफुल्ल बिडवई यांनी अनेक वर्ष या पुस्तकाच्या मांडणीवर काम केले मात्र त्यांच्या मृत्यू पश्चात हे पुस्तक प्रकाशित झाले. प्रफुल्ल बिडवई यांनी अगदी तटस्थपणे या पुस्तकामध्ये डाव्या चळवळींची झालेली परिस्थिती मांडाली आहे. प्रामुख्याने या पुस्तकामध्ये प्रफुल्ल बिडवई यांनी स्वातंत्र्यपुर्व काळात भाकपं या डाव्या पक्षाने वारंवार बदलेल्या भुमिका आणि धोरणांची मीमांसा केली आहे , ते या संशोधनपत्रात मांडण्याचा प्रयत्न केला आहे

## साहित्य अवलोकन-

साहित्य अवलोकन करत असताना त्यांच्या 'द फिनिक्स मोमेंट : द चॅलेंजेस फेसिंग इंडियन लेफ्ट आणि 'भारतातील डाव्या चळवळीचा मागोवा – इतिहास, आव्हानं आणि नवसंजीवनीच्या शक्यता' या प्रफुल्ल बिडवई च्या इंग्रजी आणि मराठी आवृत्तीच्या एकाच पुस्तकाचे अवलोकन करण्यात आले आहे. या पुस्तकामध्ये त्यांनी भारतातल्या डाव्या चळवळींची पसरलेली मुळं ते डाव्या चळवळीच्या घसरणीची कारणे याची सविस्तर चर्चा केलेली आहे. सदरील संशोधनपत्र प्रफुल्ल बिडवई च्या याच पुस्तकावर आधारलेलं असल्याने याच पुस्तकाचा अभ्यास सदरील संशोधनामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

## उद्दीष्टे-

१. स्वातंत्र्यपुर्व काळातील भाकपची वारंवार बदलेली धोरणं आणि भुमिका-प्रफुल्ल बिडवई ची मीमांसा
२. 'भारतातील डाव्या चळवळीचा मागोवा – इतिहास, आव्हानं आणि नवसंजीवनीच्या शक्यता'- या पुस्तकाचा अभ्यास
३. भाकपच्या वारंवार बदलत्या भुमिकांमुळे पक्षाची झालेली घसरण

## गृहितके-

१. भाकप या पक्षाने स्वातंत्र्यपुर्व काळात वारंवार आपल्या भुमिका बदलल्या
२. 'भारतातील डाव्या चळवळीचा मागोवा – इतिहास, आव्हानं आणि नवसंजीवनीच्या शक्यता'- या पुस्तकात डाव्या चळवळीच्या ऱ्हासाची कारणे मिळतात
३. वारंवार बदलणाऱ्या भुमिकांमुळे भाकप संपण्याच्या स्थितीत असून त्याचा उहापोह प्रफुल्ल बिडवई यांनी केला आहे त्याचा अभ्यास.

## मुख्य विषय मांडणी-

भारतात डाव्या चळवळीचा उदय हा एम. एन. रॉय यांच्या पुढाकाराने झाला असं सर्वसाधारणपणे मानण्यास काही हरकत नाही १९२५ साली भारतात भाकप म्हणजेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. सोशालिस्ट पक्षाला आणखीन १० वर्षे उदय होण्यास वाट पाहावी लागली. जगामध्ये स्टॅलिनचा बोलबाला असताना , स्टॅलिनवाद आणि इतर डावे विचार जगात आपली मुळं मजबूत करत असतानाचा भारतात देखील भाकप ची स्थापना झाली. जगभरात असलेल्या डाव्या प्रभावानेच भारतातली डावी चळवळसुध्दा आकार घेत होती. १९२० च्या उत्तरार्धापर्यंत कॉमिन्टर्नवर कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएत युनियनचा पूर्णपणे दबदबा होता.१९२८ साली कॉमिन्टर्नच्या सहाव्या काँग्रेसने जे धोरण आखलं होतं, त्याच धोरणाने भारतात सुरू असलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जडणघडण आणि प्रवास सुरू होता. विदेशात ठरलेल्या गोष्टींची भारतात पक्ष म्हणून त्याची अंमलबजावणी होणार होती. असं बिडवई यांनी आपल्या पुस्तकाच्या सुरूवातीच्या प्रकरणातच मांडलं आहे.सुरवातीला जोमाने वाढलेल्या चळवळीला उतरती कळा लागत असताना डाव्यांच्यामध्ये असलेली विविधताच त्यांना बाधक ठरली , मात्र डावे त्यांच्यातीलच विविधतेतील एकतेला टिकवण्यास कमी पडले आणि इथूनच डाव्या चळवळीची अधोगती सुरू झाली. डाव्या चळवळीच्या विविधतेल्या लागलेल्या उतरती कळा विषयी मांडताना बिडवई म्हणतात – "भारतीय समाजात पूर्वापार बहुसांस्कृतिकतेची आणि लोकप्रिय सामाजिक चळवळींचीही परंपरा होती आणि१९४० च्या दशकापर्यंत डाव्या राजकारणाच्या क्षेत्रातही त्याच परंपरेला अनुसरून मोठ्या प्रमाणावर बहुविविधता आलेली होती. कम्युनिस्ट आणि समाजवादी पक्षांखेरीज डाव्या विचारांच्या रचना व संघटनांमध्ये स्वतंत्र अशा मार्क्सवादी प्रवाहांचा आग्रह धरणाऱ्या गटांच्या स्वरूपात इतरही काही

प्रवाह निर्माण झालेले होते. असा प्रवाहांमध्ये थर्ड इंटरनॅशनल आणि स्टॅलिनवादी वारशाला नाकारणारे होते, समाजवादाची स्वतंत्रपणे व्याख्या करून त्याची कास धरणारे इंडेजिनिस्ट आणि राष्ट्रवादी गट, सामाजिक सुधारणा आणि दलित मुक्ती यांवर भर देणारे प्रादेशिक पक्ष होते आणि मानवतेच्या दृष्टिकोनातूनसर्वसमवादाचा, साम्ययोगाचा विचार मांडणारे निम-गांधीवादी गट होते, ज्यांतून पुढे अमूलाग्र बदलाचा आग्रह धरणारी जहालमतवादी सर्वोदयची आवृत्तीही निर्माण झाली." कॉमिन्टर्नचा विषाक्त प्रभाव मांडताना पुढे बिडवई म्हणतात: भारतीय कम्युनिस्ट नेत्यांवर कॉमिन्टर्न व कम्युनिस्ट पार्टी ऑफ ग्रेट ब्रिटन यांचा प्रभाव होता आणि त्याचप्रमाणे युरोपकेंद्रीत विचार करणाऱ्या एमएन रॉय यांच्यासारख्या पूर्वीच्या कम्युनिस्ट नेत्यांचा प्रभाव होता. वास्तविक जात,धर्म, भाषा, प्रादेशिक विविधता आणि त्याच्याशी निगडीत अशा, खास भारतातच आढळणाऱ्या सामाजिक समस्यांकडे या नेत्यांनी पूर्णत दुर्लक्ष केलं होतं. त्यामुळे भाकपचे सिध्दांत आणि, व्युहनिती व डावपेचांना याच प्रवृत्तींनी आकार दिला. आता विषाक्त प्रभावाबाबत सांगायचं झालं तर, सर्वाधिक प्रभाव विशेष करुन सीपीजीबी चे रजनी पाम दत्त यांचा होता. दत्त यांचे कॉमिन्टर्नशी निकटचे संबंध होते आणि ते भाकपचे प्रमुख सल्लागार बनले होते. कॉमिन्टर्नच्या निर्देशांनुसार तयार झालेली युरोपकेंद्रीय भूमिका रॉय आणि दत्त यांनीच नाही तर श्रीपाद अमृत डांगे आणि गंगाधर अधिकारी यांच्यासारख्या भाकपच्या नेत्यानीही पुढे नेली. कॉमिन्टर्नच्या साहाव्या काँग्रेसमध्ये ठरलेलं अल्ट्रा-लेफ्ट अर्थात अतिरेकी डावं धोरण भाकपने अनुसरलं आणि त्यानुसार१९२८ मध्ये भाकप ने काँग्रेस हा कामगार आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधात असलेला बुर्झ्वा नॅशनलिस्ट पक्ष असल्याची टीका केली. त्याचप्रमाणे त्यांनी गांधींना अन ओपनली काउंटर -रेव्होल्युशनरी फोर्स अर्थात उघडच प्रतिक्रांतिकारी शक्ती असल्याचं घोषित केलं याचा परिणाम असा झाला की, अनेक वर्ष अत्यंत परिश्रमपूर्वक कामगारवर्गात काम करून त्यांच्या पक्षाचा या वर्गात जो प्रभाव निर्माण झाला होता, तो अशा गोष्टींमुळे कमी झाला आणि पक्षाची ताकद उतरणीला लागली. पुढे कॉमिन्टर्नच्या सातव्या काँग्रेसमध्ये स्वीकारलेल्या धोरणाच्या अनुषंगाने भाकपने घूम जाव करून आधीच्यापेक्षा पूर्णत उलट अशी भूमिका स्वीकारली. भांडवलशाहीविरोधी संघर्षाच्या भूमिकेवर पाणी सोडून भाकपने काँग्रेसमध्येप्रबळ असलेल्या नेत्यांशी सहाकार्य करण्याच्या व्यूहनीतीचा पुरस्कार केला. वास्तविक, तेव्हा काँग्रेस पक्षाचं धोरण उजवीकडे झुकू लागलं होतं व तो पक्ष संपूर्णस्वतंत्र संविधान संभेची आपली मागणी सोडून देण्याच्या बेतात होता आणि तरीही भाकपने अशी भूमिका घेतली होती पुढे बिडवई म्हणतात एकंदरीत असे परिणाम लक्षात घेता , भाकपच्या भूमिकेतील सातत्याचा अभाव ही गंभीरच गोष्ट होतीपंरतु इथवरचा सातत्याचा आभावही कमी गंभीर वाटेल अशा परस्परविसंगत अशा भूमिका भाकप ने धर्माधिष्ठीत राष्ट्र म्हणून पाकिस्तानची निर्मीती व्हावी वा नाही, या महत्वाच्या प्रश्नावर घेतल्या आणि त्यानंतर भारत पाकिस्तान फाळणीच्या बाबतीत तर अत्यंत अंतर्विरोधी अशा भुमिकांची लक्षणीय मालिकाच भाकपने सादर केली. १९४२ मध्ये झालेल्या भाकपच्या केंद्रीय समितीच्या बैठकीने गंगाधर अधिकारी यांच्या पाकिस्तान अँड नॅशनल युनिटी या भूमिकापर निबंधाच्या आधारे १९ सप्टेंबर १९४२ रोजी असा ठराव संमत केला की , ते पाकिस्तानच्या मागणीतील मूलतत्वाला समर्थन देत आहेत. नंतर मे १९४३ ला झालेल्या पक्षाच्या पहिल्या अधिनवेशनात या ठरावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. गंगाधर अधिकारी म्हणजे भाकप पक्षाची सैध्दांतिक मांडणी करणारे एक तत्वचिंतक. त्यांनी केलेल्या विश्लेषणाच्या आधारेच भाकप पक्षाने पाकिस्तानच्या मागणीला पाठिंबा दिला होता.परंतु वस्तुत स्टॅलिन यांनी राष्ट्र आणि राष्ट्रवादाची व्याख्या करताना त्यात (एखाद्या प्रदेशाच्या वा समाजाच्या) काही स्वाभाविक गुणधर्मांचे निकष स्विकारार्ह मानले होते व त्यांत धर्माचाही सामावेश होता. अधिकारी यांनी त्या व्याख्येचा शब्दश: अर्थ लागू करून फाळणीचे समर्थन केले होते. राष्ट्रीयत्वाच्या आणि अल्पसंख्याकवादाच्या मुद्द्यावर वाद असल्यास स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला वाव ठेवणं आणि वेळ पडल्यास फुटून निघण्याची टोकाची भूमिका घेणं हे अशा भूमिकेचा आंतरिक भाग होतं.'भाकप'ने १९३० मध्ये आपल्या पक्षकार्यक्रमाचा जो मसुदा तयार केला होता, त्यात (याच तत्त्वानुसार) 'स्वयंनिर्णयाच्या हक्का'चा समावेश केलेला होता आणि त्यात पूर्णतः फुटून निघण्याचा (सेसेशनचा) हक्कही समाविष्ट केला होता. १९४१मध्येही त्यांनी त्याच भूमिकेचा पुनरुच्चार केला होता

१९४२च्या ऑगस्ट महिन्यात झालेल्या 'काँग्रेस वर्किंग कमिटी'च्या ऐतिहासिक अशा 'चले जाव' सत्रात बहुसंख्य सभासदांनी, ब्रिटिशांनी तत्काळ देशातून निघून जावं, या मागणीला पाठिंबा दिला होता. परंतु, कम्युनिस्ट समिती सदस्यांनी मात्र त्या मागणीला विरोध केला आणि त्याऐवजी मुस्लीम लीगसोबत पूर्वकरार केला जावा, अशी मागणी केली. १९४२च्या नोव्हेंबर महिन्यात 'भाकप'ने 'युनिटी वीक' अर्थात 'ऐक्य सप्ताह' पाळला होता आणि त्या प्रसंगी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्या जाहीरनाम्यात हिंदू-मुस्लीम ऐक्यावर आधारित प्रांतिक सरकारची निर्मिती केली जावी, असा काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यामध्ये करार केला जावा, अशी कल्पना कम्युनिस्टांनी पुढे केली होती. अशा सूचनेचा पुरस्कार केल्यावर कम्युनिस्ट पक्षाला('भाकप'ला) नेहरूंसह सर्वच काँग्रेस नेत्यांच्या टीकेच्या भडिमाराला समोरं जावं लागलं. १९४५ च्या डिसेंबर महिन्यात 'ऑल इंडिया काँग्रेस कमिटी मधून ('एआयसीसी' मधून) कम्युनिस्टांना काढून टाकण्यात आलं. परंतु असं सर्व घडूनही'भाकप' पक्ष बधला नाही. पक्षाने १९४६ च्या एप्रिल महिन्यात 'ब्रिटिश कॅबिनेट मिशन'ला एक निवेदन दिलं आणि

त्याद्वारे 'स्वयंनिर्णया'च्या भूमिकेला आपला पाठिंबा असल्याचं असंदिग्ध शब्दांतमिशन'ला स्पष्ट केलं. मात्र अशी भूमिका घेणारा हा पक्ष पुढील काळात मात्र, फाळणी म्हणजे 'साम्राज्यवादी कारस्थान' अशी टीका करून फाळणीचा निषेध करणार होता! भाकप'ने पाकिस्ताननिर्मितीच्या समर्थनार्थ भूमिका घेताना काही महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्णतः काणाडोळा केला. एक म्हणजे, प्राथ्यम्याने धर्माच्या आधारे राज्य राष्ट्राची निर्मिती झाल्यास काय समस्या येऊ शकतात. आणि दुसरं म्हणजे, फाळणी झाल्याचे त्याचे सांप्रदायिक आणि मानवी स्तरावर काय परिणाम घडू शकतात, या दोन्ही गोष्टींकडे त्यांनी पूर्ण दुर्लक्ष केलं परंतु, जसजशी फाळणीची वेळ जवळ येत गेली तसतसा पक्षाने आपला पवित्रा बदलला. १९४७च्या जून महिन्यात पक्षात येऊ घातलेल्या स्वातंत्र्याबद्दल असं म्हटलं की, हे स्वातंत्र्य म्हणजे पूर्ण स्वातंत्र्यापेक्षा थोडं अधुरं असंच आहे पण तरीसुद्धा, त्यायोगे लोकांच्या हाती एक हत्यार उपलब्ध झालं आहे आणि (त्यामुळे) स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल करणं सुकर होईल ३ ऑगस्ट १९४७ रोजी 'भाकप'ने पुन्हा नव्याने संघर्ष उभा करण्याच्या दृष्टीने स्वतःला समर्पित करण्याची घोषणा केली... 'देशाला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आणि 'मातृभूमीचं स्वेच्छेने पुनर्मीलन साध्य करण्याच्या दृष्टीने पहिलं पाऊल म्हणजे, भारत आणि पाकिस्तान यांमध्ये बंधुभावात्म सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणं'

फाळणीनंतर 'भाकप'ने पक्षाच्या अनेक 'मुस्लीम' सदस्यांना पाकिस्तानमध्ये स्थलांतरित होण्यास प्रोत्साहित केलं त्यांमध्ये प्रख्यात साहित्यिक आणि 'प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन'चे संस्थापक सज्जाद ज़हीर यांचा समावेश होता. त्यांना १९४८मध्ये पश्चिम पाकिस्तानमध्ये तेथील कम्युनिस्ट पक्षाचं बस्तान बसवण्यासाठी पाठवण्यात आलं परंतु ही व्यवस्था यशस्वी ठरली नाही ज़हीर यांना सतत त्रास दिला गेला आणि नंतर 'रावळपिंडी कटा'च्या बनावट प्रकरणामध्ये गोवून चार वर्षांसाठी त्यांना तुरुंगात पाठवण्यात आलं. १९५५मध्ये त्यांना हद्दपार करून भारतात पाठवण्यात आलं. परंतु त्यापूर्वी त्यांच्याकडून असं लेखी पत्र (अंडरटेकिंग) लिहून घेण्यात आलं की, 'ते पुन्हा कधीही पाकिस्तानच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाहीत' आणि 'नेहरूंच्या संरक्षणाखाली' त्यांना परत पाठवण्यात आलं. ऑगस्ट १९४८मध्ये 'भाकप'ने पाकिस्तान संदर्भात आणखी एक अतिरेकी भूमिका घेतली. 'हू रुल्स पाकिस्तान?' (पाकिस्तानवर सत्ता कोण गाजवतं?) या शीर्षकाखालील एका पत्रकाद्वारे पक्षाने, पाकिस्तानात 'बनावट स्वातंत्र्य आणि बनावट नेतृत्व' असल्याची टीका करून त्याचा निषेध केला आणि तेथील सत्ताधारी हे लुटीवर जगणाऱ्या सर्वभक्ष्यी बूर्झ्वाजमीनदार वर्गाचे असून ते 'साम्राज्यवादी' आणि 'परदेशी शोषकां'च्या हातचं बाहुले आहेत अशी टीका केली त्याचप्रमाणे, 'पाकिस्तानातील शोषण करणारे जमीनदार आणि भांडवलदार' हे 'सांप्रदायिक भावना भडकवतात' आणि 'परदेशी भांडवलदारांशी गुप्तपणे करार करतात आणि 'दोघं मिळून संगनमताने पाकिस्तानचं शोषण करतात, असा आरोपही त्या पत्रकातून केला होता. त्यात पुढे असं म्हटलं होतं की, 'पाकिस्तानी राज्यसंस्था ही नागरी स्वातंत्र्य आणि लोकशाही हक्कांच्या उल्लंघनाच्या आधारेच उभी आहे आणि अशी राज्यसंस्था लोकांना धार्मिक अंधश्रध्दांपासून मुक्त होण्याचं स्वातंत्र्य देण्याची हमी देऊ शकत नाही. मात्र त्या पत्रकात पुढे असंही म्हटलं होतं की, भारतीय जनतेप्रमाणे पाकिस्तानी जनतेलाही अजून स्वतःला पुर्णपणे मुक्त करून घ्यायचं आहे आणि आपला देश परदेशी शोषकांना विकला जाऊ नये, यासाठी देशाचा बचाव करायचा आहे. एका अतिरेकी भुमिकेपासून माघार,पुन्हा दुसरी अतिरेकी भुमिका, पुन्हा दोलायमान होऊन त्याही भूमिकेपासून घूमजाव अशी धरसोडीची नागमोडी वाटचाल भाकपला सतत करावी लागण्याचं कारण हेचं होतं की विचारप्रणाली आणि सैध्दांतिक चौकट ठरवण्याठी पक्ष सततच कॉमिन्टर्न आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएत युनियन यांच्या उसनवार कल्पनांवर विसंबून राहिला आणि त्याबाबत पक्षाने जवळपास त्यांचं वैचारिक दास्यत्वचं पत्करलं.

अशा प्रकारे डाव्यांनी त्यातही भाकपने कधीच देशाच्या समर्थनार्थ भूमिका घेतल्याचं किंवा वारंवार आपल्या भुमिका सोव्हिएतप्रमाणे बदलत असल्याचं चित्र उभं केल्याचं या पुस्तकाच्या स्वातंत्र्यपुर्व भागात मांडले आहे यामुळे बिडवई यांनी स्वातंत्र्यपुर्व काळातल्या भाकपच्या बदलत्या भुमिकेची मीमांसा केल्याचे दिसते

## निष्कर्ष-

१. भाकप या पक्षाने भारतात राहून नेहमी भारतविरोधी भुमिका घेतल्याचं बिडवई यांच्या या मिमांसेमधून दिसतं

२. भाकप पक्षाने कॉमिन्टर्नच्या निर्णयावर आणि त्यांच्या झालेल्या काँग्रेसच्या आधावर भारतातील निर्णय आणि धोरणे स्विकारली जी स्वाभाविकत: भाकपच्या जडणघडणीला मारक ठरली त्यामुळे भाकप सारख्या बलाढ्य पक्षाचे पुढे पतन झाले

३. कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएत युनियनच्या आणि स्टालिनच्या विचारावरून भारतात कम्युनिझम रूजवण्याचा प्रयत्न भाकपकडून झाला, इथल्या धार्मिक, भाषिक आणि प्रादेशिक विविधतेनुसार भारतीय कम्युनिस्ट पार्टी धोरणे आणि कार्यक्रम देऊ शकली नाही, परिणामी भारतीय कम्युनिस्ट पार्टीला वारंवार आपल्या भूमिका बदलाव्या लागल्या

४. कम्यनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएत युनियनच्या उसनवार कल्पनांवर भाकप विसंबून राहिला आणि विदेशी विचारांचं दास्यत्वच एका प्रकारे भारतीय कम्युनिस्ट पार्टीने स्विकारल्याचं प्रफुल्ल बिडवई यांनी स्पष्ट केलं
५. त्यामुळे एकंदरीत अशा प्रकारे निष्कर्ष यातून काढला जाऊ शकतो तो म्हणजे विदेशी कार्यपध्दती विदेशी धोरणे, वैचारिक मान्यता, विचारप्रवाह यांच्यावर विसंबून विविधतेने नटलेल्याभारतामध्ये एखादा पक्ष किंवा संघटना उभ्या करताना भारतीय परिप्रेक्ष्यात विचार करून धोरणं ठरवणं गरजेचं आहे नाही तर मग भाकप सारखी अवस्था झाल्याशिवाय राहात नाही.

**संदर्भ-**

१. द फिनिक्स मोमेंट : द चॅलेंजेस फेसिंग इंडियन लेफ्ट- लेखक- प्रफुल्ल बिडवई
२. 'भारतातील डाव्या चळवळीचा मागोवा – इतिहास, आव्हानं आणि नवसंजीवनीच्या शक्यता' – मूळ लेखक प्रफुल्ल बिडवई अनुवाद मिलिंद चंपानेरकर